**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 31-10-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-10-31 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-11-01 | 2025-11-02 | 2025-11-03 | 2025-11-04 | 2025-11-05 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 11.9 | 4.8 | 3.4 | 0.8 | 0.4 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.6 | 30.1 | 29.4 | 30.1 | 29.7 |
| किमान तापमान (अं.से) | 22.2 | 22.2 | 22.2 | 21.6 | 20.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 94 | 91 | 92 | 86 | 79 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 66 | 59 | 63 | 52 | 57 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 2 | 2 | 5 | 5 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 259 | 323 | 344 | 18 | 90 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 5 | 4 | 5 | 4 | 4 |
| चेतावणी | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

## भविष्यवाणी सारांश:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०१ ते ०५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक ०१ व ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक ०३, ०४ व ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

०१ व ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी तुरळक (एक/दोन) ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

संभाव्य पावसाने परिपक्व अवस्थेतील पिक पावसामुळे खराब होऊ शकते.

## कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील धान, सोयाबीन इत्यादी पिकाची कापणी व मळणीची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. मळणी शक्य नसल्यास कापणी केलेले पीक उंचवट्यावर शेतात किंवा मळणी यार्डमध्ये साठवावा. मळणी उरकून घ्यावी. पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी कापणी

केलेले पीक प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीने झाकून ठेवावे. • रब्बी पिकांची पेरणी, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे सुरु ठेवावी. • वेचनीला आलेल्या कापसाची वेचणी वाण परत्वे वेचणी करून कोरड्या ठिकाणी साठवावा. • कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे पावसापासून होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा. • शेतकरी बांधवांद्वारा पशुधनासाठी शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादीचे संभाव्य पावसामुळे नुकसान होऊ शकते अथवा त्याची प्रत व गुणवत्ता ढासळू शकते त्यामुळे शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादी चारा ताडपत्री अथवा प्लास्टिक शीट च्या सहाय्याने झाकून ठेवावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• कापणी केलेला शेतमाल पावसाचा अंदाज लक्षात घेता प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मोहरी | • संरक्षित ओलिताखालील सलग मोहरीची पेरणी ७ नोव्हेंबर पर्यंत करावी. पुसा बोल्ड जातीचे हेक्टरी ५ किलो बियाणे ४५ सेंमी अंतरावर पेरावे. हेक्टरी १०० किलो युरिया व २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. अधिक उत्पादन वाढीसाठी प्रती हेक्टरी २० किलो गंधक आणि १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळी द्यावे. |
| हरभरा | • हरभरा पिकाचे पेरणी करिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. • हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, या बीज प्रक्रियेसाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बुरशीनाशकाची शिफारस केली आहे. |
| गहू | • गहू पिकासाठी मध्यम भारी, खोल व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. गहू पिकासाठी जमीन तयार करताना १५ ते २० सेंमी खोल नांगरणी करावी. वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. पूर्वीच्या पिकाची धसकटे, काडी कचरा वेचून शेत स्वच्छ करावे. गहू लागवड शक्यतो समपातळीत असावे जेणेकरून पुढील ओलीत व्यवस्थापन करता येईल आवश्यकता भासल्यास जमीन समपातळीत आणण्यासाठी पाटा मारावा. • पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. • गहू बियाण्यास पेरणीपूर्वी अ‍ॅझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. • गहू पिकामध्ये बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी गव्हाच्या बियाण्याला बीजप्रक्रिया करावी, यासाठी शिफारस केलेले बुरशीनाशक आणि कीटकनाशके पुढीलप्रमाणे आहेत. बंट (Bunt), ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्बोक्सिन 75 % डब्ल्यूपी @ 2-2.5 ग्रॅम/किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी डायफेनोकोनाझोल ३ % डब्ल्यूएस @ २ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एफएस @ ०.३ मिली प्रती किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डब्ल्यूएस @ ३ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा तांबेरा व काणी रोग तसेच वाळवी आणि मावा किडीच्या प्रादुर्भावाचे |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | व्यवस्थापन करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १८.५ % + हेक्साकोनाझोल १.५ % एफएस @ ३ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीज प्रक्रिया करावी. |
| करंडई | • करडी पिक सलग पिक न घेता आंतरपीक म्हणून हरभरा, जवस पद्धतीमध्ये करडी + हरभरा (६:३) किंवा करडी + जवस (३:३) या प्रमाणात घेता येते. कोरडवाहू करडी पिकास ४० किलो नत्र (१९४ किलो अमोनियम सल्फेट किंवा ८७ किलो युरिया) + २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रती हेक्टर पेरणीच्या वेळी द्यावे. |
| भात | • परिपक्व झालेल्या धान पिकाची कापणी ही जमीनीलगत करावी जेणेकरुन खोडकिडीची सुप्तावस्था नष्ट होऊन उन्हाळी धान पिकात या किडीचा प्रादुर्भाव कमी होइल. • कापलेला धान पिक २ - ३ दिवस उन्हात वाळू द्यावे व वाळल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीस खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी. • तुडतुडे :- धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम अनिसोप्ली या जैविक बुरशीचा १.१५ % @ २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा. तुडतुड्यांची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ % प्रवाही @१६ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • आभासमय काजळी:- धान पिकाच्या ५०% फुलोऱ्याच्या वेळेस कॉपर हायड्रास्काईड ७७ % डब्लू.पी. ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. |
| कपाशी | • वेचनीला आलेल्या कापसाची वेचणी वाण परत्वे करून कोरड्या ठिकाणी साठवावा. • कपाशी पिकामध्ये पाते, फुले आणि बोंडे लागण्याच्या अवस्थेत मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे आंतरिक बोंड सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आल्यास, व्यवस्थापनासाठी विकसित अवस्थेतील बोन्डाना चिकटलेल्या वाळलेल्या पाकळ्या गोळा करून शेताबाहेर नष्ट कराव्या. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळावा. कापूस पिकाच्या अतिरिक्त वनस्पती वाढीस प्रतिबंध करा. पिक क्षेत्रात पाणी साचू नये म्हणून शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा. या रोगास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २५ ग्राम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने बोंडे विकसित होण्याच्या सुरुवातीच्या फवारणी करावी. शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या फवारणीने रस शोषक किडीचे व्यवस्थापन करावे. • मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशी मध्ये बोंडे लागण्याच्या अवस्थेत गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व नुकसानीचे निरीक्षण करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रती झाड एक बोंड या प्रमाणे २० बोंडे तोडून त्याचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी [१० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या किंवा १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे] (२० बोंडापैकी किमान २ बोंडामध्ये पांढरी किंवा गुलाबी अळी किंवा अळी बाहेर पडण्याचे छिद्र असल्यास) गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास प्रोफेनोफोस ५० ईसी३० मिली प्रती १० लिटर पाणी (१५०० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमॅमेक्टिन बेंझोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १४.५ एससी १० मिली प्रती १० लिटर पाणी (५०० मिली प्रती हेक्टर) किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली प्रती १० लिटर पाणी (१२५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात मिसळून फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| सोयाबीन | • पुढील हंगामात बियाणासाठी सोयाबीन चा वापर करावयाचा असल्यास, बियाणे उगवणाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ३५० ते ४०० आरपीएम या वेगावर थ्रेशरने सोयाबीनची मळणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • गादीवाफ्यावर कांदा बियाणे हेक्टरी ८ ते १० किलो पेरावे. कांदा लागवडीसाठी पांढऱ्या कांद्याच्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता आणि पुसा व्हाईट राउंड व लाल कांद्याच्या |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | जाती: पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३ आणि बसवंत ७८० या वाणाची निवड करावी. |
| अळशी | • बागायती जवस पेरणी ७ नोव्हेंबर पर्यंत करावी. पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास कार्बेन्डाझीम २ ग्राम किंवा थायरम ३ ग्राम लाऊन बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ३ तासांनी अॅझोटोबॅक्टर २० ग्राम व स्फुरद विरघळणारे जीवाणू २० ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| संत्रा | • तन व्यवस्थापन करून बाग स्वच्छ ठेवावी. झाडाच्या बुन्ध्याजावालाची जमीन भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या झाडांना १०८ ग्राम युरिया आणि ४५ ग्राम म्युरेट ऑफ पोटाश द्यावे. दोन वर्ष वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्ष वयाच्या झाडांना तिप्पट तर चार वर्ष वयाच्या झाडांना चौपट खताची मात्रा द्यावी. खते देतांना नेहमी जमीन हि वाफसा अवस्थेत असल्याची काळजी घ्यावी जेणेकरून पिकास दिलेल्या खताची बचत होईल. बहार असलेल्या फळ बागेतील झाडांना ५०० ग्राम युरिया, ६०० ग्राम सिंगल सुपर फॉस्फेट, १५० ग्राम म्युरेट ऑफ पोटाश, १०० ग्राम फेरस सल्फेट, १०० ग्राम मॅंगनीज सल्फेट, १०० ग्राम झिंक सल्फेट आणि ५० ग्राम बोराक्स प्रत्येक झाडांना द्यावे. • आंबिया बहार घेण्यासाठी ओलीत थांबवून पाण्याचा ताण द्यावा. फळ काढणीनंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्या व त्यानंतर १ टक्के कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. माव्हा किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी या पैकी एका किटकनाशकाची आलटून पालटून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. कोळी किडीचा प्रादुर्भाव असल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायकोफॉल २ मिली किंवा प्रोपारगाईट १ मिली किंवा इथिओन २ मिली किंवा पाण्यात विरघळणारे गंधक ३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने नमूद किटकनाशक बदलून दुसरी फवारणी करावी. याआधी झाडाच्या बुंध्याला बोर्डेक्स पेस्ट लावली नसल्यास लावावी. चांगल्या प्रतीचे बोर्डेक्स पेस्ट तयार करण्यासाठी एका प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात मिसळून भिजवावे, दुसऱ्या प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो चुना ५ लिटर पाण्यात भिजवून रात्रभर भिजवून ठेवावा. दुसऱ्या दिवशी दोन्ही बादल्यातील मिश्रण एकत्र ढवळावे. मिश्रण तयार झाल्यानंतर १२ तासाच्या आत वापरावे. फायटोप्थोरा/डिंक्या ग्रस्त झाडावरील डिंक चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा व मेफेनोक्झाम एमझेड किंवा फॉसीटील एएल आम्लाची पेस्ट लावावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी ६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |
| सामान्य सल्ला | • लसून, मुळा, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा,गाजर, गवार, वाटणा इत्यादी भाजीपाला पिकाची लागवड करावी. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| संभाव्य पावसाने परिपक्व अवस्थेतील पिक पावसामुळे खराब होऊ शकते. |

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| • पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील धान, सोयाबीन इत्यादी पिकाची कापणी व मळणीची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. मळणी शक्य नसल्यास कापणी केलेले पीक उंचवट्यावर शेतात किंवा मळणी यार्डमध्ये साठवावा. मळणी उरकून घ्यावी. पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी कापणी केलेले पीक प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीने झाकून ठेवावे. |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**